**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**अमरावती कृषी हवामान सल्ला** **शुक्रवार, दि. ०५ फेब्रुवारी २०२१**

| हवामान घटक | हवामान अंदाज ( दिनांक ०६ ते १० फेब्रुवारी २०२१)) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०६/०२ | ०७/०२ | ०८/०२ | ०९/०२ | १०/०२ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३२.० | ३२ | ३०.७ | ३१.६ | ३२ |
| किमान तापमान (अं.से.) | १२.८ | ११.९ | १०.६ | ११.६ | १२.६ |
| वा-याची दिशा | ६२ | ६० | ५८ | ५७ | ५७ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ३२ | ३५ | ३० | ३० | २९ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १८० | ८८ | ८० | ६० | ८० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानुसार दिनांक ०६-१० फेब्रुवारी २०२१ दरम्यान हवामान कोरडे राहील. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कपाशी | वेचणी | वेचणी पूर्ण झाल्यावर पिकाची फरदड घेवू नये. पिकाचा हंगाम आता संपवून किडग्रस्त बोंडासहित पराटया जमा करून त्याचा शेंद्रीय खात करण्यासाठी उपयोग करावा. |
| तूर | फुल | वेळेवर पेरणी केलेले तूर पिक शेंगा पक्वता ते काढणीच्या अवस्थेत आहे, काढणीला आले असल्यास पिकाची काढणी करून माल तयार करावा व तयार झालेला सुकलेला मालची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| हरभरा | फुल | उशिरा पेरणी झाल्येल्या हरभरा पिकाला दाणे भरण्याच्या अवस्थेमध्ये पिकाला पाण्याचा तण पडू देऊ नये. ओलीत करतेवेळी पाणी शेतात साचणार नाही याची काळजी घावी.<br>हरभरा पिकाची पाहणी करावी व हरबरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसताच घाटे अळीने आर्थिक नुकसानाची पतळी (१-२ अळ्या प्रती ओळ किंवा ५ टक्के किडग्रस्त घाटे) पार केल्यास नियंत्रणासाठी पहिली फवारणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन ५० मि.ली किंवा १५०० पीपीएम अझाडीरेक्टीन २५ मि.ली किंवा एच.ए.एन.पि.व्हि ($१x१०^{९}$ पिओबी / प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी) ५०० एल.ई / हे. किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के ई.सी २० मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच दुसरी फवारणी (पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी) इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एसजी ३ ग्रॅम किंवा ईथिऑन ५० टक्के ईसी २५ मि.ली. किंवा फ्ल्युबेंडामाईड २० टक्के डब्ल्युजी ५ मि.ली किंवा क्लोरान्ट्रोनिलीप्रोल १८.५ एस.सी. २.५ मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| गहू | वाढ | वेळेवर पेरलेल्या बागायती गव्हास पेरणीनंतर ६५ ते ७० दिवसांनी फुलोर अवस्थेत ओलीत करावे. उशिरा पेरणी झाल्येल्या बागायती गव्हास पेरणीनंतर ४५ ते ५० दिवसांनी कांडीअवस्थत ओलीत करावे. |
| उन्हाळी तिळ | पेरणी | उन्हाळी तिळाची पेरणी फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्या पर्यंत बियाणे ३ ते ४ किलो व रासायनिक खत २५:२५:०० नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टर या प्रमाणे करावी. नत्राची मात्रा पेरणीवेळी अर्धी व पेरणीनंतर एका महिन्यांनी अर्धी द्यावी. पेरणीसाठी शिफारस केलेलं वाण ( एकेटी-१०१, पिकेव्ही-एनटी-११) चा समावेश करावा. |
| उन्हाळी सुर्यफुल | पेरणी | ओलिताचे पाणी उपलब्ध असल्यास उन्हाळी सुर्यफुलाची पेरणी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्या पर्यंत तुषार सिंचनाखाली करावी.<br>उन्हाळी सुर्यफुलाची उगवणीनंतर १०-१५ दिवसांनी विरळणी करून एका ठिकाणी एकच जोमदार रोपटे ठेवावे. विरळणीस जास्त उशीर करू नये. विरळणी योग्य वेळी केल्यामुळे हेक्टरी रोपांची अपेक्षीत संख्या राहून उत्पादन चांगले मिळते. ओलीत वेवस्थापनसाठी पिकाला उगवणीच्या अवस्थामध्ये ओलीत करावे. |
| उन्हाळी भुईमुग | पेरणी | ओलिताचे पाणी उपलब्ध असल्यास उन्हाळी भुईमुगाची पेरणी थंडीचा अंमल कमी होण्यास सुरवात झाल्यावर म्हणजे फेब्रुवारी च्या पहिल्या आठवड्या पर्यंत रुंद वाफा सरी पद्धतीने तुषार सिंचनाखाली करावी. पेरणीवेळी भुईमुगाला २५ किलो नत्र (११० किलो अमोनियम सल्फेट किंवा ५५ किलो युरिया) आणि ५० किलो स्पुरद (३०० किलो सिंगल सुपर फोस्फेट) प्रती हेक्टरी ध्यावे. जमिनीची माती परीक्षण झाली असल्यास व अवश्यतेनुसार ३० किलो पालाश सुद्धा पेरणीवेळेस ध्यावे. उन्हाळी हंगामात पेरणीपूर्वी पाण्याची पहिली पाळी द्यावी. वापसा आल्यानंतर पेरणी करून लगेच पाण्याची दुसरी पाळी द्यावी. पेरणीसाठी टीएजी-२४ वाणाची निवड करावी, त्यासाठी बियाणे हेक्टरी १२५ किलो वापरावे. पेरणीपूर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम/किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मे ५ ग्रॅम/किलो, या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. पेरणीनंतर शक्यतोवर खांडण्या पडणार नाही असे पाहावे पण असल्यास उगवणीनंतर ताबडतोब म्हणजे १० दिवसांच्या आत खांडण्या भराव्यात. |
| करडी | फुल/ दाणे भरणे | करडई पिकात दाणे भरण्याच्या अवस्थेमध्ये ( पेरणीपासून ८० दिवसांनी ) पिकाला पाण्याचा तण पडू देऊ नये. ओलीत करतेवेळी पाणी शेतात साचणार नाही याची काळजी घावी.<br>करडई पिकास ढगाळ वातावरणामुळे पिकावरील मावा किडीचा प्रादुर्भाव (३० टक्के प्रादुर्भावग्रस्त झाडे) दिसताच डायमीथोएट ३० टक्के प्रवाही १३ मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भाजीपाला | वाढ | टरबूज पिकाचे नियोजन असल्यास किमान तापमानात वाढ होताच सुधारित वाण सुगरबेबी, अर्का माणिक, पुसा बेदाणा यापैकी निवड करून रुंद सारी वरंबा पद्धतीने लागवड करावी.<br>उन्हाळी हंगामात चवळी पिकाचे नियोजन असल्यास पुसा ऋतूराज वाण जज्यामध्ये ४०-४५ दिवसात शेंगा काढणीला येतात. या जातीची झाडे बुटकी असून भरपूर शेंगा येतात. शेंगाचे उत्पादन हेक्टरी ८ ते ८.५ तन पर्यंत मिळते. या वेतिरिक्त वाण पुसा दो-फसली, पुसा फाल्गुनी या जातीचे उत्पन्न हेक्टरी ९ टन पर्यंत मिळते.चवळीच्या सुधारित जातीची लागवड कर्व्याची असल्यास ४५ x ३० सें.मी किंवा ६० x ४५ सें.मी अंतरावर सपाट वाफ्यात करावी.<br>कांदा पिकाची पुनर्लागवड झालेल्या क्षेत्रात ओलीत वेवास्थापनसाठी दर ८-१२ दिवसांनी पाण्याच्या पाळ्या द्यावेत किंवा पिकाच्या गरजेनुसार, हंगामानुसार जमिनिच्या मगदुरा प्रमाणे हा कालावधी कमी जास्त करावा. पिक स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी ३-४ निंदन द्यावेत.<br>उन्हाळी भेंडीची लागवड सारी वरंबा पद्धतीने १० ते १५ किलो हेक्टरी बियाणे ४५ x ३० सें. मी. अंतरावर जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात करावी त्यासाठी सुधारित जाती मध्ये प्रगती (डॉ पंदेकृवि विकसित), अर्का अनामिका, पुसा मखमली, परभणी क्रांती, फुले विभक्ता या जातीची निवड करावी.<br>वांग्यामध्ये शेंडा आणि फळे पोखरण्या-या अळीच्या नियंत्रणासाठी ४ % निंबोळी अर्क ५० मिली प्रति १० लिटर किंवा सायपरमेथ्रीन २५%, ५ मि.ली प्रति १० लिटर या प्रमाणात फवारावे. |

| | | |
|---|---|---|
| | | शिफारसीनुसार या महिन्यात गावर, काकडी, दुधी भोपळा, काशीफळ, दोडका, कारली, ढेमसे, पालक, मुळा, मेथी आणि कोथिंबीरची लागवड करावी व त्यांचे ठिबक किंवा सिंचन पद्धतीने ओलीत वेव्स्थापन करावे. |
| फळझाडे | वाढ | आंबा मोहराचे तुडतुडे व कोळी या किडीपासून संरक्षण करण्यासाठी डॉयमिथोएट ३० टक्के १६.५ मिली अधिक पाण्यात मिसळणारे गंधक ३० ग्रॅम किंवा डिनोकॅप १० मिली १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>मृग बहराचे संत्र्याची फळे तोडण्यापूर्वी १० ते १५ दिवसाआधी पाणी देणे बंद करावे नंतर पक्वतेनुसार काढणी करून व प्रतवारी करून विक्री करावी.<br>आंबिया बहाराच्या वेळी जीब्रालिक आम्ल १ ग्रॅम आणि युरिया १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी, यामुळे बहार चांगल्या प्रकारे येण्यास मदत होते.<br>आंबिया बहाराचा ताण पूर्ण झालेल्या व ओलीत सुरु झालेल्या झाडांना यावेळी झाडावर नवती व आंबिया बहाराची फुले व फलधारणा होते, तसेच उष्णतामानातही वाढ होते म्हणून जमिनीनुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने नियमित पाणी द्यावे. ठिबक सिंचन संच असल्यास १ ते ४ , ५ ते ७ व ८ वर्षावरील झाडांना अनुक्रमे ९ ते ४०, ६० ते ९६ व १०८ ते १३७ लिटर प्रती दिवस पाणी ध्यावे.<br>जमिनीतील ओलावा टिकून राहण्याकरिता व तापमान संतुलित राहण्याकरिता फळझाडाचे आळ्यात पाला- पाचोलाचे २ ते ३ इंच झाड आछदन करावे.<br>केळी व पपई फळ पिकाचे शिफारसीनुसार कीड व रोग नियंत्रण करावे. पपईची केवडा रोगग्रस्त झाडे उपटून जाळावीत. |
| चारा पिक | लागवड | जनावरांना चा-यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार एकदल वर्गीय (मका, ओट) व व्दिदल वर्गीय (लसुन, बरसीम) घासाची पेरणी करावी. |
| पशु / जनावरे | - | सध्यस्तितीत कुकुटपालना मध्ये बर्डफ्ल्यू या रोगामुळे होणाऱ्या पक्षांच्या अक्स्मक मृत्यूच्या सर्वेक्षणासाठी, काळजीपूर्वक लक्ष ठेवावे तसेच आपल्या कढील पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.<br>जनावरांना बंद शेड मध्ये ठेवावे व छोट्या पिल्लांची योग ती काळजी घावी, तसेच त्यांच्या बसण्याच्या ठिकाणी पाला - पाचोळा पसरवे, त्यामुळे थंडी पासून त्यांचे सौरक्षण होईल.<br>जनावरांना पायखुरी व तोंडखुरी रोगाची प्रतिबंधक लस पशु दवाखान्यात नेऊन टोचावी. जनावरांना स्वच्छ पाणी पाजावे.<br>शेळ्या व मेंढया यांना बुळकांडी रोगप्रतिबंधक लसीकरण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.